क्रमांक: तंमुगा १००९/सीआर-३१/ पोल-१५
गृह विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ /१०/२००७

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त (महसूल),
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक,

विषय- **"महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम"**
दाखल तंट्यांची माहिती (दि. ३०/९/२००७ पर्यंत) संकलीत करण्याबाबत.
संदर्भ - समक्रमांकाचे दिनांक १९/९/२००७ चे पत्र.

संदर्भित समक्रमांकाचे दिनांक १९/९/२००७ चे पत्र कृपया पहावे.

२. दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम" राज्यात सुरु झाली आहे. सदर शासन निर्णयानुसार दिनांक १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन "तंटामुक्त गाव समिती" स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तंटामुक्त गाव समितीने गावातील दाखल असलेल्या दिवाणी, महसुली, फौजदारी व इतर तंटयाची माहिती दिनांक ३० सप्टेंबर, २००७ पर्यंत जमा करावयाची होती. तथापि, गणेशोत्सव व ग्रामपंचायतींच्या निवडणुका यामुळे सदर माहिती संकलनास पुरेसा अवधी मिळणार नाही हि बाब विचारात घेऊन शासन निर्णय क्रमांक तंमुगा १००९/सीआर-३७/ पोल-१५, दिनांक २८ सप्टेंबर, २००७ अन्वये उक्त माहिती संकलनाची मुदत वाढवून दि १५ ऑक्टोबर, २००७ अशी करण्यात आलेली आहे. त्यामुळे संदर्भित दिनांक १९ /०९/२००७ च्या पत्रान्वये मागविण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती सादर करण्याबाबतचे सुधारीत वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

१) ग्रामपंचायतींनी संबंधित पोलीस ठाण्याकडे प्रपत्र - १ मध्ये माहिती संकलित करुन दिनांक २२ ऑक्टोंबर, २००७ रोजी पाठवावी.

२) संबंधित पोलीस ठाण्यांनी ग्रामपंचायतीची माहिती संकलित करुन प्रपत्र- २ मध्ये भरुन तहसिलदार यांच्याकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २००७ पर्यंत पाठवावी व त्याची एक प्रत उप विभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे पाठवावी.

३) सर्व तहसिलदार यांनी पोलीस ठाणेनिहाय माहिती संकलित करुन प्रपत्र-३ मध्ये भरुन ती माहिती तहसिलदार व संबंधित पोलीस ठाण्याचे प्रमुख यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांना व सदस्य सचिव तथा जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २००७ पर्यंत प्रपत्र -४ मध्ये संकलित करुन पाठवावी आणि त्याची प्रत उप विभागीय अधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना पाठवावी.

४) जिल्हयाची माहिती प्रपत्र-४ मध्ये संकलित करुन जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी संयुक्त स्वाक्षरीने विभागीय आयुक्त व विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना दिनांक ५ नोव्हेंबर, २००७ पर्यंत पाठवावी आणि त्याची प्रत गृह विभागाचे प्रधान सचिव (विशेष) आणि पोलीस महासंचालक यांना पाठवावी.

५) सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांनी त्यांच्या परिक्षेत्रातील जिल्हयांची माहिती संकलित करुन त्याचा अहवाल पोलीस महासंचालक यांना प्रपत्र-५ मध्ये दिनांक ७ नोव्हेंबर, २००७ पर्यंत पाठवावा.

६) विभागीय आयुक्त यांनी सर्व जिल्हयाची माहिती संकलित करुन त्याचा अहवाल प्रपत्र- ६ मध्ये संकलित करुन प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग यांना दिनांक १३ नोव्हेंबर, २००७ पर्यंत पाठवावा.

७) पोलीस महासंचालक यांनी सर्व परिक्षेत्रातील जिल्हयांची माहिती संकलित करुन प्रपत्र क्रमांक - ७ मध्ये त्याचा अहवाल दिनांक १३ नोव्हेंबर, २००७ पर्यंत प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग यांना पाठवावा.

२. तरी, वरीलप्रमाणे विहीत कालावधीत कार्यवाही करण्यात यावी ही विंनती.

आपला,

(मो.आ.गुट्टे)
अवर सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन.

सोबत: प्रपत्र १ ते ७ चे नमुने.